आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
८ जुलै २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- मुंबईत एकात्मिक पूरनियंत्रणासाठी १३ हजार कोटी रुपयांचा आराखडा केंद्राला सादर केल्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत निवेदन

- लोककला प्रोत्साहन योजनेत नमन, खेळे, जाखडी, वहीगायन आणि झाडीपट्टीचा समावेश

- देशभरात काल पर्यंत ३५१ लाख हेक्टर जमिनींवर खरिपाच्या पेरण्या पूर्ण

- नवी मुंबई विमानतळामार्गे औषधं आयात करायला केंद्र सरकारची परवानगी

**आणि**

- राज्यातल्या पावसाच्या स्थितीबद्दल केंद्रीय गृहमंत्र्यांची मुख्यमंत्र्यांशी चर्चा

**<><><><><>**

मुंबईमध्ये एकात्मिक पूरनियंत्रणासाठी १३ हजार कोटी रुपयांचा आराखडा राज्य सरकारने केंद्राला सादर केला असून त्याद्वारे मुंबईत ३७० हॉटस्पॉट्स ठरवले आहेत. पाऊस आणि भरती एकाच वेळी असताना या ठिकाणांवर साचणार पाणी अर्ध्या तासात बाहेर कसं काढता येईल, यावर या आराखड्यात भर दिला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. राज्यात पावसामुळे झालेल्या हानीबाबत त्यांनी आज निवेदन दिलं. मिसिंग लिंकजवळ दरड कोसळल्याप्रकरणी, इथली सुरक्षाव्यवस्था आणखी भक्कम कशी करता येईल, याबाबत आआयटी मुंबईच्या तज्ज्ञांकडून शिफारशी मागवल्या आहेत, असंही ते म्हणाले.

कोकणात काही ठिकाणी परिस्थिती हाताळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना अधिक निधी वितरित केला आहे, असंही त्यांनी सांगितलं. मुंबई शहराला होणारा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी गारगाई धरण येत्या ३ वर्षांत पूर्ण करायचं आश्वासन त्यांनी दिलं. मुंबई खड्डेमुक्त करणं, तसंच वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सुरू असलेल्या विविध कामांची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

मुंबईत जेजे आणि केईएम रुग्णालयात २-३ मशीनद्वारे, चिरफाड न करता शवविच्छेदन प्रक्रिया सुरू होईल. ही प्रक्रिया यशस्वी झाली तर राज्यात सर्वत्र मशीनच्या माध्यमातून शवविच्छेदन सुरू करू अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. ९० टक्के प्रकरणांमध्ये मशीनद्वारे आणि १० टक्के गंभीर प्रकरणात पारंपरिक आणि मशीन अशा दोन्ही प्रकारे शवविच्छेदन करता येईल, असं ते म्हणाले. शवविच्छेदकांची रिक्त पदं भरण्याची प्रक्रिया लवकर पूर्ण करू असं आश्वासन पण त्यांनी दिलं.

येत्या १० वर्षात राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बस इलेक्ट्रिक करणार आहोत. हे काम पूर्ण झाल्यावर अशा प्रकारे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत पूर्णपणे इलेक्ट्रिक बसचा वापर करणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य असेल अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. ५ हजार १५० बस भाड्याने घेण्याचे कंत्राट महामंडळाने दिले आहे. त्यातल्या ९०७ बस वापरत असल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यात कुठल्याही भागात पुरवण्यासाठी एसटी बस देण्याची महामंडळाची तयारी असल्याचे ते म्हणाले. एप्रिल २०२४ ते जानेवारी २०२६ दरम्यान ४ हजार २८१ अपघात झाले. याप्रकरणी नियमानुसार चालकांवर नियमानुसार कारवाई केल्याची माहिती त्यांनी लेखी उत्तरात दिली. आतापर्यंत ६७ लाख नागरिकांनी एन सी एम सी कार्ड काढल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

राज्यातल्या समृद्ध लोककला परंपरेचं जतन, संवर्धन आणि प्रसार करण्यासाठी राज्य शासनाने लोककला अनुदान पॅकेजचा विस्तार करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापुढे ‘नमन खेळे’, ‘जाखडी’, ‘वहीगायन’ आणि ‘झाडीपट्टी’ या चार पारंपरिक लोककलांचा, लोककला अनुदान योजनेत समावेश करण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत केली. या योजनेअंतर्गत प्रत्येक लोककला प्रकारातल्या २० कलापथकांना प्रत्येकी ५० हजार रुपये याप्रमाणे १० लाख रुपये वार्षिक अनुदान देण्यात येणार आहे.

<><><><><>

मुंबई शहरात २०२५-२६ या एका वर्षात ८५५ झाडं पडल्याची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज विधानसभेत दिली. या भागातल्या सर्व झाडांचं जोखीम मूल्यांकन करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने एका वृक्षतज्ञ कंपनीची नियुक्ती केली असून वांद्रे भागात ५ हजार झाडांवर प्रायोगिक तत्त्वावर त्यांचं काम सुरू आहे. या संस्थेचा अहवाल ६ महिन्यांत मिळाल्यानंतर त्यानुसार इतर ठिकाणी उपाययोजना करू, असं आश्वासन त्यांनी दिलं. याशिवाय, या सर्व कामावर लक्ष ठेवणं, आयत्या वेळी उपाययोजना करण्यासाठी एक समिती स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू आहे, असंही त्यांनी सांगितलं. महानगरपालिकेच्या उद्यान विभागात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्याचे निर्देश संबंधितांना दिले जातील, असंही मिसाळ म्हणाल्या.

<><><><><>

यंदाच्या पावसाळ्यात एलनिनो प्रभावाची शक्यता लक्षात घेऊन त्या दृष्टीनं तयारी करण्यासाठी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज नवी दिल्ली इथं एक उच्चस्तरीय बैठक घेतली. बैठकीनंतर पत्रकार परिषदेत चौहान यांनी सांगितलं, की गेले काही दिवस देशभरात जेरदार पाऊस होत असून पाणीटंचाईग्रस्त जिल्ह्यांची संख्या २६२ वरुन १७८ झाली आहे. काल पर्यंत ३५१ लाख हेक्टर जमिनींवर खरिपाच्या पेरण्या पूर्ण झाल्या असून यंदा पेरणीक्षेत्र ४४२ लाख हेक्टर आहे.  मोसमी पावसाचं आगमन लांबल्यामुळे तूर, सोयाबीन, कापूस आणि इतर पिकांच्या पेरणीवर परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांनी मका, बाजरी, आणि मूग अशा कमी पाण्यावर लौकर वाढणाऱ्या पिकांना प्राधान्य द्यावं, असं आवाहन कृषीमंत्र्यांनी केलं.

<><><><><>

औषधांची आयात नवी मुंबई विमानतळामार्गे करायला केंद्र सरकारने परवानगी दिली आहे. त्याकरता औषध नियम १९४५ च्या नियम ४३ ए मधे केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं आवश्यक सुधारणा केल्या आहेत. याबरोबरच औषधांच्या आयातीसाठी केलेल्या सूचीतल्या स्थानांची संख्या ४२ झाली आहे.

<><><><><>

राजधानी मुंबईत पावसानं काहीशी उसंत घेतली असली तरी नाशिक आणि पालघर जिल्ह्यात अद्याप पावसाचा जोर कायम आहे. ठिकठिकाणची धरणं संततधार पावसामुळे भरुन

वाहू लागली आहेत. मुंबई शहराला पाणीपुरवठा करणारे विहार आणि तुळशी तलाव भरुन वाहू लागल्याचं मुंबई महानगरपालिकेनं सांगितलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी राज्यातल्या पावसाच्या स्थितीबद्दल चर्चा केली. केंद्राकडून सर्वतोपरी मदत मिळेल असं आश्वासन शहा यांनी मुख्यमंत्र्यांना दिलं.

**रत्नागिरी** जिल्ह्यात पावसाचा जोर ओसरला आहे; मात्र वातावरण अद्याप ढगाळ आहे. आज सकाळी संपलेल्या २४ तासांमध्ये जिल्ह्यात सरासरी ४३ पूर्णांक ७ दशांश मिलिमीटर पाऊस पडला.

जून महिन्यात जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या फक्त १४ पूर्णांक ३९ शतांश टक्के पाऊस झाला होता; मात्र त्यानंतर पावसाने जोर धरल्यामुळे आजपर्यंत वार्षिक सरासरीच्या ३६ पूर्णांक २६ शतांश टक्के पावसाची नोंद झाली आहे. गेल्या वर्षी या दिवसापर्यंत ३७ पूर्णांक ३९ शतांश मिलिमीटर पाऊस झाला होता.

गेल्या काही दिवसांमधल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातल्या एकूण ७१ धरणांपैकी २१हून अधिक धरणं पूर्ण क्षमतेने भरली आहेत.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून संततधार पाऊस सुरु असून तिथलं जनजीवन अजूनही पूर्वपदावर आलेलं नाही. जिल्ह्यातल्या सर्व शाळा तसंच महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे.

पश्चिम रेल्वेच्या नालासोपारा ते वसई स्थानकादरम्यान रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने डहाणू–वसई मार्गावर उपनगरी आणि लांब पल्ल्याच्या गाड्या धीम्या गतीने चालत आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव नालासोपारा ते वसई दरम्यान गाड्यांचा वेग ताशी १० किलोमीटर इतका मर्यादित करण्यात आला आहे.

**<><><><><>**

नाशिक शहरासह इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, पेठ तसंच सुरगाणा परिसरात मुसळधार पाऊस सुरु आहे. नाशिक शहराच्या अनेक भागात पाणी साचलं असून काही ठिकाणी घरामध्ये पाणी शिरलं. गोदावरी नदीच्या पाणी पातळीतही वाढ झाली आहे. वणी इथल्या सप्तश्रृंगी

गडाच्या मार्गावर दरड कोसळण्याची शक्यता निर्माण झाल्यानं हे मंदिर गुरुवारपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे. या आपत्कालीन परिस्थितीमुळं शाळांना सुट्टी देण्यात आली आहे.

नाशिक जिल्ह्याच्या घाटमाथा परिसरात आजही रेड अलर्टचा इशारा देण्यात आला आहे.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यात नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून आज सकाळी ९ वाजल्यापासून गोदावरी नदीपात्रात १२ हजार ६२० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला असून, नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनी सतर्क राहावे, तसंच नदीपात्रातलं साहित्य आणि जनावरे तात्काळ सुरक्षित स्थळी हलवावी, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.पावसाचे प्रमाण कायम राहिल्यास विसर्गात टप्प्याटप्प्याने आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

वाशीम जिल्ह्यातल्या अकोला - हैदराबाद या राष्ट्रीय महामार्गावर तोंडगाव इथं असलेला टोल नाका जप्त करण्याचे आदेश वाशिम जिल्हा न्यायालयाने काल दिले आहेत. या टोल नाक्यावर रोज लाखो रुपयांची उलाढाल होते.

वाशीम वळणरस्त्यासाठी एका शेतकरी कुटुंबाची जमीन घेतल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने कोट्यवधींचा मोबदला थकवला आहे. त्यामुळं लवादाचा आदेशही धुडकावल्यानंतर शेतकऱ्यांनी जिल्हा न्यायालयात धाव घेतली.

**<><><><><>**

भांडुपमधल्या कोकण नगर इथे बेस्टच्या बसनं काही पादचाऱ्यासह रस्त्यावरच्या अनेक वाहनांना जोरदार धडक दिली. आज सकाळी झालेल्या दुर्घटनेत वाहनांचं मोठं नुकसान झालं असून एकजण गंभीर जखमी झाला. चालकाचं बसवरचं नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. तर सोमवारी रात्री, वाशी टोल नाक्यावरून जात असताना बस चालकाला अचानक अपस्माराचा तीव्र झटका आल्यामुळे होऊ शकणारा मोठा अपघात वाहकाच्या तत्परतेमुळे आणि समयसूचकतेमुळे टळला. चालकाचं चालत्या बसवरचं नियंत्रण सुटलं. मात्र, वाहकानं त्वरित प्रतिसाद देत इतर वाहनं आणि पादचाऱ्यांना धडकण्यापूर्वी बस सुरक्षितपणे थांबवली.

**//<><><><><>//**